बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १५ जुलै २०२३**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६२/२०२३ भादवि ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०७/२०२३ रोजी २३.४५ वा ते दि १३/०७/२०२३ रोजी ०६.०० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी सोलापूर. |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी ०६.३० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सोमनाथ निलकंठ कांबळे,वय-४३ वर्षे,रा- १६३,संगमेवश्वर नगर अ.कोट रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १९,०००/- रू चे त्यात निळा रंगाचा आयटेल चा मोबाईल, रोख रक्कम,आधारकार्ड,ड्रायव्हीग लायसन्स.जुवाकिअ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/०७/२०२३ रोजी २३.४५ वा ते दि १३/०७/२०२३ रोजी ०६.०० वा च्या दरम्यान यातील फिर्यादी हे झोपेत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे उघडे दारातून हॉलमध्ये प्रवेश करून फिर्यादीचे पॅन्टच्या पाठीमागील खिशातील नमुद रोख रक्कम मोबाईल चोरी करून घेवून गेला आहे.म्हणून.तपास- पोहेकॉ/२७३/गायकवाड-७३५०२७३२७३ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३८५/२०२३ भादवि १४३,१४७,१४९,३२४,३२३,५०४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०७/२०२३ रोजी २३.४५ वा. दहिटणे,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी ०४.४५ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | महादेवी राजेश बिराजदार,वय-४२ वर्षे,रा-कण्णी प्लॉट समर्थ नगर दहिटणे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.बहादुरसिंग गंगाराम रजपुत, २) सुधिरसिंग बहादुरसिंग रजपूत, ३) शुभम प्रकाशसिंग काटेवाले, ४) आकाश बाळु कांबळे, ५) शांताबाई बहादुरसिंग रजपूत,रा-दहिटणे,सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १३/०७/२०२३ रोजी २३.४५ वा.च्या सुमारास यातील फिर्यादीचे दिर दऱ्याप्पा बिराजदार हे भाचीचा नवरा यातील आरोपी क्र २ यांचे घरासमोर जावून दि १२/०७/२०२३ रोजी झालेल्या भांडणाबाबत विचारपूस करत असताना त्यांना आरोपी क्र ३ हा मारहाण करीत असताना फिर्यादी व त्याचे पती,जाऊ श्रीदेवी असे तेथे जावून भांडण सोडवासोडवी करत असताना यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी सर्वाना शिवीगाळ करून हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून अरोपी क्र १ याने लोखंडी टोकदार खिळा आणुन त्याने फिर्यादीचे पती राजेश याचे डाव्या बरगडीवर मारून दुखापत केले आहे तसेच फिर्यादी ची भाची राजश्री व नणंद शारदा कोळी असे मिळून पोलीस ठाणे येथे तक्रार देण्यासाठी आले असता आरोपी क १ याने पाठीमागून येवून नणंद शारदा कोळी हिचे डाव्या दंडावर मारून दुखापत केली आहे.म्हणून.तपास- सपोनि जाधव- ९८५०९७५९२० |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३५९/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०७/२०२३ रोजी २३.३० वा ते दि १४/०७/२०२३ रोजी ०६.०० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरासमोरून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी १९.३५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रभाकर कोमरय्या सिंगरल,वय-६७ वर्षे,रा- १०२,सी/५०,घोंगडे वस्ती भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |

| | | |
|---|---|---|
| **गेला माल** | | ३०,०००/- रू ची काळे रंगाची त्यावर पांढरा पट्टा असलेली हिरो स्प्लेडर मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ ए वाय ४४५४ ही वरील ठिकाणी घरासमोरून हॅन्डल लॉक करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून फिर्यादीचे वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास- मपोह/२२/जाधवर- |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६३/२०२३ भादवि ३२३,१४३,१४६,१४७,१४९,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०७/२०२३ रोजी २२.३० वा चे सुमारास केशव नगर, मौलाली चौक सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी ०१.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | ईस्तीयाक हबीब शेख,वय-३५ वर्षे,रा-२५०,शास्त्री नगर मिलत मोहल्ला दक्षिण सदर बझार सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) उमर ऊर्फ फिरोज मशाक शेख,२) जुबेर बसरी,३) जब्बार बशरी,४) वसीम मोहोळकर,५) एजाज दंन्डो व इतर दोन अज्ञात इसम. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/०७/२०२३ रोजी २२.३० वा च्या सुमारास यातील फिर्यादी हे त्यांची कॅन्टीनमध्ये चहा बनविणारे वस्ताद असे मिळून अप्सरा चहा कॅन्टीन बंद करून घरी जात असताना यातील नमुद आरोपी मजकूर यांनी मिळून उस्ताद ईस्तायीक रंगरेज यांचेशी पाठीमागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून दोघाचे अंगावरती धावून येवून शिवीगाळ करून हाताने तसेच लाथाबुक्यांनी तसेच जमीनीवर पडलेले दगड फरशीचे तुकडयांनी मारहाण केली तसेच आरोपी क्र १ यांने त्यांच्याजवळील चाकुने मारल्याने फिर्यादीचे डाव्या हाताचे पंज्यास खरचटुन जखम झाली आहे.म्हणून.तपास-पोसई माळी- **८८८८८५२०९७** |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६४/२०२३ भादवि ३२३,१४३,१४६,१४७,१४९,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०७/२०२३ रोजी २३.०० वा. केशव नगर मौलाली चौक सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी ०२.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | उमर मशाक शेख ऊर्फ फिरोश बशरी,वय-३५ वर्षे,रा-२३८/१३,शास्त्री नगर मिल्लत मोहल्ला सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.इस्तीयाक हबीब शेख, २) बब्बु ईस्माईल शेख,३) सलमान हबीब शेख,४) इमाद मुन्ना शेख ५) मुन्ना शेख,६) इस्तियाक रंगरेज,७) इतर दोन ते तीन जण |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १२/०७/२०२३ रोजी २२.०० वा च्या सुमारास यातील फिर्यादी हे मावा आणण्यासाठी आकिब पान शॉप येथे गेले असता त्यावेळी पान शॉप बंद असल्याने फिर्यादी तसेच थांबले असता तेथे यातील नमुद आरोपीत मजकूर यांनी येवून आरोपी क्र ६ यांचेशी झालेल्या भांडणाचा व मागील भांडणाचा राग मनात धरून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण केली त्यावेळी आरोपी क्र १ याने फिर्यादीचे डोक्यात लोखंडी पाईपने मारल्याने फिर्यादी जखमी झाले फिर्यादीस जखमी अवस्थेत भाऊ जुबेर बासरी यांने सिव्हील हॉस्पीटल येथे आणले. फिर्यादीचे डोक्यात टाके पडले असून त्यानंतर फिर्यादी घरी जात असताना पुन्हा नमुद आरोपीत मजकूर यांनी मिळून फिर्यादीस आडवून लाथाबुक्यांनी मारहाण करून आरोपी क्र १ याने इसको बहुत मस्ती है असे म्हणून त्याचे हातातील चाकुने फिर्यादीचे डाव्या हाताचे दंडावर मारले तसेच आरोपी क्र ३ यांने त्यांचे हातातील चाकुने फिर्यादीचे डोकीत डाव्या बाजूस मारल्याने फिर्यादीचे डोकीस जखम झाली आहे.म्हणून.तपास-पोसई माळी-**८८८८८५२०९७** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६७/२०२३ भादवि ३५३,३३२,१४३,१४७,३८५,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०७/२०२३ रोजी १२.१५ वा. जवाहर नगर कमानीचे बाजूला सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी १९.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | रामकृष्ण सावरय्या कोमल्लु,वय-५० वर्षे,व्यवसाय- नोकरी सोलापूर महानगरपालिका येथे रस्ते विभाग भूमापक .रा-३२,कल्याण नगर भाग-२ दत्त मंदिर मागे जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.शांतीलाल साबळे,२) गणेश शिंदे व त्यांचे इतर ५ ते ७ अनोळखी साथीदार सर्व रा- सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १३/०७/२०२३ रोजी १२.१५ वा च्या सुमारास जवाहर नगर कमानीचे बाजूला सोलापूर येथे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत पाथरूट चौक ते गेटयाल चौक असे डांबरी रोडचे काम अण्णाभाऊ साठे जयंती करीता वर्गणी स्वरूपात खंडणी मागून बंद पाडले होते, सदर रस्त्याचे काम बंद पाडले आहे.यातील आरोपी मजकूर यांनी सदर रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे सांगितले त्यावेळी फिर्यादी त्यास सदर बाबत तुम्ही मा.नगर अभियता साहेबांकडे तक्रार करण्यास सांगितले तेव्हा फिर्यादीस सदर काम बंद करण्यास सांगून कामगाराना हुसकावून लावू लागले त्यावर फिर्यादी त्यांना समजावून सांगत असताना त्याचे फिर्यादीचे हातातील संबंधीत कामाचे असणारे कागदपत्र,डायरी मोबाईल हिसकावून घेवून फेकून देवून फिर्यादीस हाताने मारहाण करून शिवीगाळ दमदाटी केली आहे तसेच त्याचे सोबत आरोपी क्र २ व इतर ५ ते ७ इसम यांनी कंत्राटदार यास खंडणी मागून व फिर्यादीस हाताने मारहाण करून सरकारी कामात अडथळा केला आहे.म्हणून.तपास-सपोनि मुल्ला- **८१०८०१९१००** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६८/२०२३ भादवि २७९,३३७,३३८,४२७ सह मोवाका क १८७/१७७,१३४ (ब)प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १३/०७/२०२३ रोजी १३.२५ वा ते १३.३० वा चेदरम्यान गांधी चौक आय.डी.एल. सलुन जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १४/०७/२०२३ रोजी २३.१६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मुबारक नबीलाल शेख,वय-४१ वर्षे,रा- ०९,सहारा नगर होटगी रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | शशीकांत जाधव,रा- इंद्रधनु अपार्टमेंट डोणगाव रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,दि १३/०७/२०२३ रोजी १३.२५ वा ते १३.३० वा च्या दरम्यान यातील फिर्यादी हा त्यांची पत्नी कमरूनिसा असे मो.सायकल क्र एमएच २३ ए एम ७९९७ यावरून जात असताना फिर्यादीच पाठीमागून येणारे यातील आरोपी मजकूर यांने त्याच्या ताब्यातील वाहन क्र एमएच १३ सी के ०७८३ हे वाहन हयगयीने निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवून फिर्यादीचे मोटार सायकलीस पाठीमागुन जोरात धडक देवून फिर्यादीस व त्यांची पत्नीस दुखापत करण्यास कारणीभूत ठरला आहे तसेच फिर्यादीचे मोटार सायकल यांचे नुकसान होणेस कारणीभूत ठरला आहे त्यानंतर तो अपघाताची खबर कोणासही न देता पळून गेला आहे.म्हणून.तपास-सपोनि कुलकर्णी- |